# Question Paper

| | |
|---|---|
| **Name of the Post:** | Senior Research Officer |
| **Date of the Examination:** | 1st Dec 2022 |
| **Duration :** | 60 minutes |
| **Total Marks :** | 200 |

**Question Number : 1 Question Id : 750782529**

'कॉमन वील' या वृत्तपत्राच्या माध्यमातून होमरूल चळवळीचा प्रचार कोण करत असे ?

**Options :**

1. हेलेना ब्लाव्हाटस्की
2. ॲनी बेझंट
3. मदन मोहन मालवीय
4. रविंद्रनाथ टागोर

**Question Number : 2 Question Id : 750782530**

लॉइड जॉर्ज यांनी आपल्या भाषणातून एका संस्थेची पोलादी चौकट कधीही खिळखिळी करणार नाही, असे सांगितले. ती संस्था कोणती ?

**Options :**

1. ब्रिटिश इंडियन सिव्हिल सर्व्हिस
2. इंग्रजी संसद
3. इंग्रजी शिक्षण
4. जातिव्यवस्था

**Question Number : 3 Question Id : 750782531**

१९३५ च्या कायद्याचे महत्वाचे वैशिष्ट्य कोणते ?

**Options :**

1. प्रांतात द्विदल शासनपद्धती
2. हिंदू-मुस्लीम ऐक्य
3. प्रांतीय स्वायत्तता
4. हिंदुस्तानची फाळणी

**Question Number : 4 Question Id : 750782532**

१९३२ मध्ये 'जातीय निवाडा' कोणी जाहीर केला ?

**Options :**

1. डॉ. राजेंद्र प्रसाद
2. लॉर्ड लिटन
3. रॅम्से मॅक्डोनाल्ड
4. राणी व्हिक्टोरिया

**Question Number : 5 Question Id : 750782533**

ईस्ट इंडिया कंपनीकडून भारतीय राज्यकारभार ब्रिटिश संसदेच्या ताब्यात जाण्यास कोणती घटना परिणामकारक ठरली ?

**Options :**

1. १८५७ चा उठाव
2. भारतात पारंपारिक सत्तांचा झालेला उदय
3. म. गांधी यांनी सुरू केलेली असहकार चळवळ
4. १९३५ चा कायदा

**Question Number : 6 Question Id : 750782534**

दख्खन बंधाचा पुढीलपैकी कोणता उपविभाग नाही ?

**Options :**

1. कळसुबाई
2. लोणावळा
3. वाई
4. कलाडगी

**Question Number : 7 Question Id : 750782535**

आर्द्र पानगळीची वने महाराष्ट्रात कोठे आढळतात ?

**Options :**

1. अमरावती
2. यवतमाळ
3. नाशिक
4. नागपूर

**Question Number : 8 Question Id : 750782536**

वन्यप्राणी जीवनासंदर्भात खालील जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| अ. गौर | i. महाराष्ट्रातील उंचीचे प्रदेश |
| ब. सांबर | ii. विदर्भ |
| क. चितळ | iii. अहमदनगर |
| ड. काळवीट | iv. मेळघाट |

**Options :**

1. अ – iv, ब – i, क – ii, ड – iii
2. अ – i, ब – ii, क – iii, ड – iv
3. अ – ii, ब – i, क – iii, ड – iv
4. अ – iii, ब – ii, क – i, ड – iv

Question Number : 9 Question Id : 750782537

महाराष्ट्रातील मानवी वसाहतीच्या दृष्टीने मध्याश्म युग आणि ताम्रपाषाण युगाच्या संदर्भासाठी __________ येथे संशोधन करण्यात आले.

Options :

1. पाटणे (जळगाव)
2. हातखंबा (रत्नागिरी)
3. इनामगाव (पुणे)
4. यापैकी सर्व

Question Number : 10 Question Id : 750782538

कृष्णा नदीला डाव्या किनाऱ्याने __________ नदी मिळते.

Options :

1. कोयना
2. सीना
3. येरळा
4. पूर्णा

Question Number : 11 Question Id : 750782539

आर्थिक वर्ष सुरू झाल्यावर किती महिन्यांच्या आत ग्रामसभेची पहिली सभा घ्यावी लागते ?

Options :

1. एक महिना
2. दीड महिना
3. दोन महिने

4. तीन महिने

**Question Number : 12 Question Id : 750782540**

पंचायत समितीच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

**Options :**

1. पंचायत समिती बरखास्त करण्याचा अधिकार राज्य शासनास आहे

2. पंचायत समितीचा कार्यकाल सहा वर्षांचा असतो

3. पंचायत समितीच्या सभापतीची निवड पंचायत समितीचे सदस्य करतात

4. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध सचिव असतो

**Question Number : 13 Question Id : 750782541**

माहितीचा अधिकार, २००५ प्रमाणे खालील विधानाची सत्यता पडताळा.
एखादी माहिती पुरविण्याच्या विनंतीमुळे जर राज्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर कलम ८ च्या तरतुदींना बाधा न येऊ देता, केंद्रीय किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास अशी माहिती पुरविण्याची विनंती नाकारता येईल.

**Options :**

1. सत्य आहे

2. असत्य आहे

3. काही प्रमाणात सत्य आहे

4. कधी कधी सत्य आहे

**Question Number : 14 Question Id : 750782542**

जेव्हा राज्य जन माहिती अधिकारी विनंतीचा अर्ज फेटाळतात तेव्हा माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तिस खालीलपैकी __________ कळविणे कायद्याने बंधनकारक आहे.
अ. अपील प्राधिकरणाचा तपशील.
ब. असा विनंतीचा अर्ज फेटाळण्याची कारणे.
क. ज्या कालावधीत असा विनंती अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल तो कालावधी.

**Options :**

1. फक्त 'अ' व 'क'
2. फक्त 'ब' व 'अ'
3. फक्त 'क'
4. वरील सर्व

**Question Number : 15 Question Id : 750782543**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींना अधीन राहून __________ माहितीचा अधिकार असेल.

**Options :**

1. सर्व नागरिकांना
2. फक्त राज्याच्या कर्मचाऱ्यांना
3. परदेशातून आलेल्या प्रवाशांना
4. वरील कोणालाही नाही

**Question Number : 16 Question Id : 750782544**

महाराष्ट्र राज्यात २०१८-१९ च्या जमीन वापर आकडेवारीप्रमाणे, एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी पिकाखालील स्थूल क्षेत्र २३२.१२ लाख हेक्टर तर पिकाखालील निव्वळ क्षेत्र ________ होते.
a. उपलब्ध नाही
b. सांगता येत नाही
c. १००%
d. ५५%
खालीलपैकी योग्य पर्याय कोणता ?

**Options :**

1. ‘a’ आणि ‘b’

2. ‘c’ आणि ‘d’

3. फक्त ‘d’

4. फक्त ‘c’

**Question Number : 17 Question Id : 750782545**

राज्यात औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यासाठी ____________ कार्यक्रम राबविले जात आहेत.

a. मॅग्नेटिक महाराष्ट्र

b. मेक इन इंडिया

c. रोड शो

d. परदेश प्रवास

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

**Options :**

1. ‘a’, ‘b’, ‘c’ आणि ‘d’

2. ‘a’ आणि ‘b’

3. ‘a’, ‘c’ आणि ‘d’

4. ‘a’, ‘b’ आणि ‘c’

**Question Number : 18 Question Id : 750782546**

२०००-२००१ च्या चालू किंमतीनुसार, त्याच वर्षी महाराष्ट्राच्या राज्य उत्पन्नात द्वितीय क्षेत्राचा हिस्सा ____________ इतका होता.

**Options :**

1. १४.५%

2. २२.५%

3. ३०.०%

4. ३५.५%

**Question Number : 19 Question Id : 750782547**

खालीलपैकी कोणते 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेचे उद्दिष्ट आहे ?

**Options :**

1. मुलींच्या जन्मदरात वाढ करणे

2. गर्भजल परीक्षण रोखणे

3. मुलींच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे

4. वरील सर्व

**Question Number : 20 Question Id : 750782548**

२०१९-२० यावर्षी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिला स्व-सहाय्यता गटांची एकूण संख्या ______________ इतकी होती.

**Options :**

1. ९१,३६८

2. ९५,३८६

3. ९६,४४५

4. १,२०,३१२

**Question Number : 21 Question Id : 750782549**

______________ या संस्थेने अतीव समांतर संस्करण पद्धतीचा उपयोग करून 'अनुपम' मालिकेतील महासंगणकांचा विकास केला आहे.

**Options :**

1. आण्विक इंधन कॉम्प्लेक्स

2. साहा इन्स्टिट्युट ऑफ न्युक्लिअर फिजिक्स

3. अणु ऊर्जा आयोग (AEC)

4. भाभा अणु संशोधन केंद्र, मुंबई

**Question Number : 22 Question Id : 750782550**

गृह मंत्रालयाने सायबर क्राईम जागरूकतेवरील ट्विट्ससाठी कोणते ट्विटर हँडल लाँच केले ?

**Options :**

1. सायबर सुरक्षा

2. सुरक्षा.सायबर

3. सायबर दोस्त

4. सायबर फ्रेंड

**Question Number : 23 Question Id : 750782551**

'मीडीया लॅब एशिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीचे नाव बदलून ८ सप्टेंबर २०१७ पासून ____________ असे ठेवण्यात आले आहे.

**Options :**

1. माहिती तंत्रज्ञान संशोधन अकादमी (ITRA)

2. डिजिटल इंडिया कॉर्पोरेशन (DIC)

3. ई-विद्यावाहिनी

4. लर्निंग ट्रॅकिंग फॉर्म (LTF)

**Question Number : 24 Question Id : 750782552**

______________ हे भारतातील अनेक शहरांमधील शैक्षणिक एफ.एम. (FM) रेडिओ स्टेशन आहे.

**Options :**

1. ई-एज्युकेशन

2. आकाशवाणी

3. ज्ञानवाणी

4. रेडिओ मित्र

**Question Number : 25 Question Id : 750782553**

माहिती तंत्रज्ञान संशोधन अकादमी (ITRA)चे मुख्य उद्दिष्ट ____________ हे आहे.

**Options :**

1. सायबर गुन्हे संबंधित तक्रारी

2. IT मध्ये स्पर्धात्मक लाभ मिळवणे आणि राष्ट्रीय R & D मध्ये संख्यात्मक व गुणात्मक क्षमता वाढवणे

3. संबंधित तक्रारी, आर.टी.आय. आणि संसद प्रश्न

4. यापैकी नाही

**Question Number : 26 Question Id : 750782554**

खालील विधाने विचारात घ्या.

A. भारतातील वन स्थिती अहवाल, 2021 नुसार मध्य प्रदेश हे देशातील वनव्याप्त असे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे.

B. भारतीय वन सर्वेक्षण विभागाचे मुख्यालय डेहराडून येथे आहे.

C. 2 जून 1987 रोजी भारतीय वन सर्वेक्षण विभागाची स्थापना झाली.

**Options :**

1. A व B बरोबर

2. B व C बरोबर

3. फक्त B बरोबर

4. वरील सर्व बरोबर

**Question Number : 27 Question Id : 750782555**

डोनबास हा युक्रेनचा भाग युक्रेनच्या _______ भागात आहे आणि तिथे _______ भाषा बोलणाऱ्यांची बहुसंख्या आहे.

**Options :**

1. दक्षिण पूर्व, रशियन

2. पश्चिम, युक्रेनियन

3. मध्य, पोलीश

4. उत्तर, हंगेरियन

**Question Number : 28 Question Id : 750782556**

2022 च्या 'अबेल पुरस्काराने' खालीलपैकी कोणाला सन्मानित करण्यात आले ?

**Options :**

1. डेनिस पारनेल सुल्लीवन

2. कर्टिस टी. मॅकमिलन

3. विल्यम ब्राऊडर

4. हॅल अबेलसन

**Question Number : 29 Question Id : 750782557**

खालीलपैकी कोणत्या संस्थेने 'फास्ट अँड सिक्युअर्ड ट्रान्समिशन ऑफ इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डस् (FASTER)' हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू केला ?

**Options :**

1. रिझर्व बँक ऑफ इंडिया

2. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया

3. इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया

4. सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टीगेशन

**Question Number : 30 Question Id : 750782558**

खालीलपैकी कोणत्या खेळाडूला हरवून भारताच्या पी.व्ही.सिंधू ने 2022 च्या स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद जिंकले ?

**Options :**

1. पॉर्नपावी चोचूवाँग

2. बुसानन ओंगबमरुंगफन

3. रतचानोक इंतानोन

4. येओ जिया मिन

**Question Number : 31 Question Id : 750782559**

शाळेतील सर्व 100 मुलींना नृत्य, गायन आणि वादन यातून स्वत:चा उपक्रम निवडण्याची मुभा आहे. एकाही मुलीने तीन उपक्रमांत भाग घेतलेला नाही. 50 मुलींनी फक्त नृत्याची निवड केली आहे तर 15 मुलींनी फक्त वादनाची निवड केली आहे. 25% मुलींपैकी प्रत्येकीने दोन उपक्रमांची निवड केली आहे.

फक्त गायन उपक्रमांत सहभागी असलेल्या मुलींची संख्या निवडा.

**Options :**

1. 5

2. 10

3. 15

4. 20

**Question Number : 32 Question Id : 750782560**

श्रीमंत मुडदूसग्रस्त मुलांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यांनी स्वत:साठी निर्माण केलेल्या हवाबंद, घरकोंड्या जगाचा हा परिणाम आहे. त्वचेकडून सूर्यप्रकाशाला दिल्या जाणाऱ्या प्रतिसादाच्या परिणामी तयार होणाऱ्या 'ड' जीवनसत्त्वाच्या अभावी मुडदूस होतो. उन्हात खेळणारी मुले आता इलेक्ट्रॉनिक माध्यमे पुरवत असलेल्या आभासी जगात बुडालेली असतात. उन्हाळ्यातील दीर्घ संध्याकाळी घराबाहेर घालवण्याऐवजी इलेक्ट्रॉनिक पडदा झळाळू नये म्हणून घरात ऊन येण्याला पडदे लावून अटकाव केला जातो. महामारीच्या काळात इलेक्ट्रॉनिक साधने मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक झाली. त्यामुळेही हवेशीर सार्वजनिक जागा बंदच होत्या. आता त्या खुल्या झाल्या तरीही शहरी व निमशहरी भागातील मुलांना पडलेली इलेक्ट्रॉनिक साधनांची भुरळ कमी झालेली नाही.

पुढील विधानांतून सत्य असल्यास वरील युक्तिवाद सर्वात जास्त दुबळा करणारे विधान निवडा.

**Options :**

1. ज्या काळात इंधन म्हणून सरसकट कोळशाचा, लाकडाचा घरोघरी होणाऱ्या वापरामुळे मुडदूसग्रस्तांचे प्रमाण खूप जास्त होते कारण टोकाच्या हवा प्रदूषणाचा शहरवासीयांवर परिणाम होत होता.


2. सूर्य प्रकाशाच्या तुलनेत उचित आहाराचा शरीरात निर्माण होणाऱ्या 'डी' जीवनसत्त्वाच्या प्रमाणावर लक्षणीय परिणाम होतो.

3. वर्षभरातील मुडदूसग्रस्तांची संख्या काही शेकड्यांपुरतीच मर्यादित असते.

4. शहरी व राष्ट्रीय उद्यानांसाठी आरक्षित क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.


**Question Number : 33 Question Id : 750782561**


सोबतच्या जाळीचे निरीक्षण करा.






पुढीलपैकी या जाळीला घड्या घालून बनवता न येणारा घन निवडा.

**Options :**

1. 


2. 


3. 


4. 


**Question Number : 34 Question Id : 750782562**

पाच समान कालांतरांतील गाडीच्या गतीची आलेख प्रतिमा सोबत दिली आहे.
एकूण प्रवासात गाडीची सर्वात कमाल गती दाखवणारा कालखंड निवडा.




**Options :**

1. वे$_2$ – वे$_3$
2. वे$_3$ – वे$_4$
3. वे$_4$ – वे$_5$
4. वे$_1$ – वे$_2$

**Question Number : 35 Question Id : 750782563**

पुढील तीन विधाने वाचून त्यावरून काढलेला सर्वात योग्य निष्कर्ष दिलेल्या पर्यायांतून निवडा.
अ. सर्व खेळाडू व्यक्ती कष्टाळू असतात.
आ. काही खेळाडू व्यक्ती प्रतिबंधित पदार्थ खातात.
इ. ज्या व्यक्ती बेशिस्त असतात त्या बहुत करून प्रतिबंधित पदार्थ खातात.

**Options :**

1. बेशिस्त व्यक्ती खेळाडू नसतात
2. सर्व खेळाडू बेशिस्त असतात
3. काही लोक प्रतिबंधित पदार्थ खातात ते खेळाडू असतात
4. प्रतिबंधित पदार्थ खाणाऱ्या सर्व व्यक्ती बेशिस्त असतात

**Question Number : 36 Question Id : 750782564**

क, ख, ग व घ या चार व्यक्तींच्या गटात दोन विवाहित जोडपी आहेत. दोन्ही स्त्रिया स्वत:च्या नवऱ्याच्या तुलनेत बुटक्या आहेत. 'क' सर्वात उंच असून 'ग' 'ख' पेक्षा उंच आहे. 'घ' हा 'ख' चा भाऊ आहे.

या माहितीच्या संदर्भात पुढीलपैकी चुकीचे विधान निवडा.

**Options :**

1. चारही व्यक्तींचे परस्परांशी कौटुंबिक संबंध आहेत
2. 'ख' व्यक्ती चौघातील सर्वात बुटकी आहे
3. 'ग', 'घ' पेक्षा उंच आहे
4. 'क', 'ख' चा नवरा आहे

**Question Number : 37 Question Id : 750782565**

अ, ब, क, ड, प व फ या सहा व्यक्ती परस्परांत समान अंतर राखून वर्तुळाकार बसल्या आहेत. पण त्या याच अनुक्रमाने बसलेल्या आहेत असे नाही. 'अ' आणि 'प' हे वर्तुळ व्यासाच्या विरुद्ध टोकांवर बसले आहेत पण 'प', 'ड' च्या शेजारी नाही. 'अ', 'क' च्या उजव्या बाजूला असून 'ब' च्या शेजारी नाही.

वरील माहितीनुसार सत्य नसलेले विधान निवडा.

Options :

1. ‘क’ आणि ‘ड’ वर्तुळ व्यासाच्या विरुद्ध टोकांवर बसलेले नाहीत

2. ‘क’ आणि ‘ब’ निश्चितपणे वर्तुळ व्यासाच्या विरुद्ध टोकांवर आहेत

3. ‘ड’ च्या संदर्भात व्यासाच्या विरुद्ध टोकावर येण्यासाठी ‘ब’ ला ‘प’ च्या उजव्या हाताला बसावे लागेल

4. ‘ब’ आणि ‘फ’ यांच्या नेमक्या जागा ठरवण्यासाठी ‘ब’ च्या स्थानाच्या संदर्भात अधिक माहितीची गरज आहे

**Question Number : 38 Question Id : 750782566**

चौकोन भौमितीक आकृतीमध्ये एका रिकाम्या जागी प्रश्नार्थक चिन्ह आहे. त्या ठिकाणची संख्या उत्तरासाठी लिहावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| 4 | 40 | 20 |
| 6 | 126 | 42 |
| 56 | ? | 7 |

Options :

1. 112

2. 196

3. 252

4. 166

**Question Number : 39 Question Id : 750782567**

एका संकेतानुसार ‘कृपया दार उघडा’ हे ‘मप रट दफ’ असे लिहितात. तसेच ‘दार बंद आहे’ हे ‘दफ गअ वल’ असे लिहितात. ‘सर्व उत्तम आहे’ हे ‘जझ तन गअ’ असे लिहितात. या संकेतानुसार ‘बंद’ या शब्दाचा संकेत निवडा.

Options :

1. तन

2. दफ

3. गअ

4. वल

**Question Number : 40 Question Id : 750782568**

एक बोट प्रवाहाच्या दिशेने 30 किमी/तास या वेगाने जाते व प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने 24 किमी/तास या वेगाने परत येते. तर बोटीचा संथ पाण्यातील वेग सांगा व प्रवाहाचा वेग काढा.

**Options :**

1. 26 किमी/तास व 3 किमी/तास
2. 28 किमी/तास व 3 किमी/तास
3. 27 किमी/तास व 2 किमी/तास
4. 27 किमी/तास व 3 किमी/तास

**Question Number : 41 Question Id : 750782569**

भारतातील आदिम जमातीत सर्वसाधारणपणे किती प्रकारची युवागृहे पहावयास मिळतात ?

**Options :**

1. सात
2. तीन
3. पाच
4. चार

**Question Number : 42 Question Id : 750782570**

घटनेतील कोणत्या कलमानुसार लोकसभेत व विधानसभेत आदिवासी जमातीतील लोकांसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली ?

**Options :**

1. कलम ३६६ व कलम ३४२

2. कलम ३३५ व कलम ३२०

3. कलम ३३० व कलम ३३२

4. कलम ३३८ व कलम २४४

**Question Number : 43 Question Id : 750782571**

भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये यांनी आदिवासी किंवा आदिम समाजाला कोणत्या नावाने संबोधलेले आहे ?

**Options :**

1. पुढारलेले हिंदू

2. बिघडलेले हिंदू

3. तथाकथित मूळचे रहिवासी व मागासलेले हिंदू

4. यापैकी एकही नाही

**Question Number : 44 Question Id : 750782572**

कोणत्या कलमानुसार राष्ट्रपतींना अनुसूचित जमातीचे कल्याण व अनुसूचित शेड्यूल्ड प्रदेशाचे प्रशासन या संबंधीचा आढावा घेण्यासाठी एका आयोगाची नियुक्ती करण्याचा अधिकार दिला आहे ?

**Options :**

1. कलम - ३३९ नुसार

2. कलम - ३३० व ३३२ नुसार

3. कलम - ३४० नुसार

4. कलम - ३४२ नुसार

**Question Number : 45 Question Id : 750782573**

समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समुहाला ‘आदिम समाज’ असे म्हणतात. ही व्याख्या खालीलपैकी कोणत्या विचारवंताची आहे ?

**Options :**

1. डॉ. रिव्हर्स
2. डब्ल्यू. जे. पेरी
3. मदन व मुजुमदार
4. बोगार्डस

**Question Number : 46 Question Id : 750782574**

आर्यद्रविड जमाती भारताच्या कोणत्या भागात आढळून येतात ?

**Options :**

1. पंजाब, हरियाणा, काश्मिर
2. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान
3. महाराष्ट्र, केरळ, गुजरात
4. बंगाल, ओरिसा

**Question Number : 47 Question Id : 750782575**

‘‘वंश हा असा जीवशास्त्रीय समूह आहे की, ज्यात विशिष्ट प्रकारच्या शारीरिक लक्षणांचा समुच्चय असतो. ही शारीरिक लक्षणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेली असतात.’’ असे कोणत्या विचारवंताने म्हटले आहे ?

**Options :**

1. हर्बर्ट स्पेन्सर
2. होबेल

3. कार्ल मार्क्स

4. मॅक्स वेबर

**Question Number : 48 Question Id : 750782576**

कोणत्या साली डॉ. जी.एस. घुर्ये यांनी भारतीय आदिवासी समाजाच्या वांशिक व समाजशास्त्रीय अध्ययनासाठी “The Aborigines So Called and Their Future” हा ग्रंथ लिहिला ?

**Options :**

1. 1914

2. 1943

3. 1920

4. 1930

**Question Number : 49 Question Id : 750782577**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत अनुक्रमांक ४६ वर कोणती जमात नमूद आहे ?

**Options :**

1. धोडिया

2. कमार

3. कोल

4. वारली

**Question Number : 50 Question Id : 750782578**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत अनुक्रमांक १८ वर एकूण किती जमातीची नोंद आहे ?

**Options :**

1. ५१

2. ५४

3. ५६

4. ५८

**Question Number : 51 Question Id : 750782579**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम, २००२ (क्रमांक १०/२००३) ७ जानेवारी, २००३ अन्वये महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या यादीतील कोणत्या अनुक्रमांकावरील जमाती वगळण्यात आल्या आहेत ?

**Options :**

1. ८ व ४०

2. ९ व ३६

3. १२ व ४५

4. १६ व ४७

**Question Number : 52 Question Id : 750782580**

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी कोणत्या अधिकृत संकेत स्थळावर अर्ज करता येतो ?

**Options :**

1. etribevalidity.mahaonline.gov.in

2. bartievalidity.maharashtra.gov.in

3. etribevalidity.maharashtra.gov.in

4. trti.maharashtra.gov.in

**Question Number : 53 Question Id : 750782581**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची एकूण राज्याच्या लोकसंख्येशी असलेली सन 1971, सन 1981, सन 1991, सन 2001, सन 2011 या दशकनिहाय टक्केवारी अनुक्रमे खालीलपैकी कोणती आहे ?

**Options :**

1. 7.62%, 9.19%, 9.27%, 8.85%, 9.35%

2. 7.62%, 9.27%, 8.85%, 9.19%, 9.35%

3. 7.62%, 9.19%, 8.85%, 9.27%, 9.35%

4. 7.62%, 9.19%, 9.35%, 9.19%, 9.27%

**Question Number : 54 Question Id : 750782582**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या विषयक माहितीबाबत खालीलपैकी कोणते विधान खरे आहे ?

a. सन 1991 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात होती.

b. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात होती.

c. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात होती.

d. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीची सर्वात कमी लोकसंख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे.

**Options :**

1. c व d

2. a व b

3. फक्त b

4. फक्त a

**Question Number : 55 Question Id : 750782583**

अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र वैधता प्राप्त करताना येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सन 2019 मध्ये गठित करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष खालीलपैकी कोण होते ?

**Options :**

1. श्री. पी. व्ही. हरदास
2. श्री. एम. जी. गायकवाड
3. श्री. पी. डी. करंदीकर
4. श्री. आर. वाय. गानू

**Question Number : 56 Question Id : 750782584**

खालील विधानाचे अवलोकन करावे.

a. जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीस दिवाणी न्यायालयाचा अधिकार आहे.

b. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 यातील तरतुदीविरुद्ध कोणत्याही दिवाणी न्यायालयास निर्णय घेण्याची अधिकारिता असत नाही. यापैकी कोणते विधान खरे आहे ?

**Options :**

1. a व b दोन्हीही खरे
2. फक्त a खरे
3. फक्त b खरे
4. a व b दोन्हीही खरे नाही

**Question Number : 57 Question Id : 750782585**

खालील विधानांचा विचार करा.

a. मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP No. 14767/93 कु. माधुरी पाटील वि. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणात निर्णय देताना दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये जात प्रमाणपत्र तपासणी समितीमध्ये 3 सदस्य असावेत असे नमूद आहे.

b. महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम 2003 यामध्ये जमातीचे प्रमाणपत्र पडताळणी समितीची सदस्य संख्या 5 अशी नमूद केलेली आहे.

यापैकी कोणते विधान खरे आहे ?

**Options :**

1. a व b दोन्हीही खरे आहे
2. फक्त a खरे b चूक
3. फक्त b खरे a चूक
4. a व b दोन्हीही चूक

**Question Number : 58 Question Id : 750782586**

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मध्ये एकूण किती कलमांचा समावेश आहे ?

**Options :**

1. 18 कलमे
2. 19 कलमे
3. 20 कलमे
4. 21 कलमे

**Question Number : 59 Question Id : 750782587**

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीला सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकाची रचना खालीलपैकी कोणती बरोबर आहे ?

**Options :**

1. पोलीस उप-अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई

2. वरिष्ठ पोलीस उप-अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई

3. वरिष्ठ पोलीस उप-अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई, संशोधन अधिकारी

4. वरिष्ठ पोलीस उप-अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई, वरिष्ठ संशोधन अधिकारी

**Question Number : 60 Question Id : 750782588**

खालीलपैकी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीशी कोणते कार्य जुळते ?

a. निर्गमीत जमात प्रमाणपत्राच्या तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी घेणे व निर्णय देणे.

b. जमात प्रमाणपत्राच्या अपिलावर सुनावणी घेणे व निर्णय देणे.

c. जमात प्रमाणपत्राच्या सत्यता पडताळणीसाठी पोलीस दक्षता पथकामार्फत चौकशी करणे.

d. वरील सर्व

**Options :**

1. a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

2. b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

3. b व c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

4. d वरील सर्व बरोबर

**Question Number : 61 Question Id : 750782589**

पंचायत क्षेत्रविस्तार कायदा (PESA) चा अंमल कधीपासून सुरू झाला ?

**Options :**

1. 21 सप्टेंबर 1996

2. 22 डिसेंबर 1997

3. 23 ऑक्टोबर 1996

4. 24 डिसेंबर 1996

**Question Number : 62 Question Id : 750782590**

आदिम जमातीकरिता (PVTG) महाराष्ट्र राज्यात किती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आहेत ?

**Options :**

1. २९ प्रकल्प

2. १६ प्रकल्प

3. ४ प्रकल्प

4. १ प्रकल्प

**Question Number : 63 Question Id : 750782591**

खालील विधानांचा विचार करा.

a. अनुसूचित क्षेत्र (महाराष्ट्र) आदेश, 1985 मधील घोषित केलेले क्षेत्र सन 1981 च्या जनगणनेप्रमाणे समाविष्ट केलेल्या गावाच्या आधारावर होते.

b. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र 1990 हे सन 1981 च्या जनगणनेप्रमाणे समाविष्ट केलेल्या गावाच्या आधारावर होते.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

**Options :**

1. a व b दोन्ही बरोबर

2. a चूक व b बरोबर

3. a बरोबर व b चूक

4. a व b दोन्हीही चूक

**Question Number : 64 Question Id : 750782592**

खालील विधानांचा विचार करा.

a. भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीमध्ये जनजाती क्षेत्राच्या प्रशासनाबाबत तरतूदी केलेल्या आहेत.

b. भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाबाबत तरतूदी केलेल्या आहेत.

c. भारतातील चार राज्यामध्ये जनजाती क्षेत्र (Tribal area) आहे.

d. भारतातील दहा राज्यामध्ये अनुसूचित क्षेत्र (Scheduled area) आहे.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

**Options :**

1. a, b, c व d चारही बरोबर
2. फक्त a, b, व c बरोबर
3. फक्त a व b बरोबर
4. फक्त c व d बरोबर

**Question Number : 65 Question Id : 750782593**

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजनांचा/कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी प्रकल्पस्तरीय नियोजन व मूल्यमापन समितीमध्ये किती अशासकीय सदस्यांचा समावेश असतो ?

**Options :**

1. २
2. ४
3. ६
4. ८

**Question Number : 66 Question Id : 750782594**

''अनुसूचित क्षेत्रे'' याचा अर्थ संविधानाच्या अनुच्छेद __________ च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेली अनुसूचित क्षेत्र, असा आहे.

**Options :**

1. १४४

2. २२६

3. २४४

4. ३२३

**Question Number : 67 Question Id : 750782595**

खालील विधानांचा विचार करा.

a. अनुसूचित क्षेत्र (महाराष्ट्र) आदेश, 1985 केंद्र शासनाने जाहीर केलेला आहे.

b. आदिवासी उपयोजना क्षेत्र, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले आहे.

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहे ?

**Options :**

1. a व b दोन्ही चूक

2. a व b दोन्ही बरोबर

3. a बरोबर व b चूक

4. a चूक व b बरोबर

**Question Number : 68 Question Id : 750782596**

महाराष्ट्र राज्यामध्ये (सन १९८१ च्या जनगणनेवर आधारित) यवतमाळ जिल्ह्यातील खालील तालुक्यांचा समावेश अतिरिक्त आदिवासी उपयोजन क्षेत्रात केला आहे.

**Options :**

1. मारेगांव, यवतमाळ, बाभुळगांव, कळंब, पुसद, महागांव व उमरखेड

2. मारेगांव, यवतमाळ, पांढरकवडा, झरी जामणी, घाटंजी, महागांव व पुसद

3. पांढरकवडा, पुसद, दारव्हा, दिग्रस, बाभुळगांव, राळेगांव व झरी जामणी

4. यवतमाळ, झरी जामणी, नेर, उमरखेड, मारेगांव, घाटंजी व कळंब

**Question Number : 69 Question Id : 750782597**

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या आदिवासी बरोबर कोणती समस्या निर्माण होते ?

**Options :**

1. आरोग्य खालावते

2. निरक्षरता

3. स्थानांतरीत शेती

4. कमी वेतन व स्थलांतर

**Question Number : 70 Question Id : 750782598**

''सर्व सुधारणांचा आधार शैक्षणिक व प्राथमिक शिक्षणातील सुधारणा आहे, असे कोणताही उत्साही सुधारक निश्चितपणे म्हणेल याबद्दल वाद असावयाचे कारण नाही. पण वारली सारख्या आदिमांच्या बाबतीत भाकरीचा प्रश्न त्याआधी सोडविला पाहिजे. भूकेची नैसर्गिक गरज प्रथम भागविली पाहिजे. ज्या लोकांना दोन वेळेला पोटभर भाकरी मिळत नाही. त्यांच्या विषयी साक्षरता हा अवास्तव विषय होईल.'' या आदिवासींच्या मागासलेपणाच्या आर्थिक समस्येवर असे भाष्य कोणी केले ?

**Options :**

1. महात्मा गांधी

2. वीर सावरकर

3. के. जे. सावे

4. पंडित नेहरू

**Question Number : 71 Question Id : 750782599**

19 व्या शतकामध्ये मिझोराममधील ५० ते ८०% आदिवासींनी कोणता धर्म स्विकारला ?

**Options :**

1. मुस्लीम
2. बौद्ध
3. ख्रिश्चन
4. पारसी

**Question Number : 72 Question Id : 750782600**

आदिवासी लोकांमध्ये स्थिरता, एकरूपता व एकता टिकवून ठेवण्यात खालीलपैकी कशाची भूमिका महत्त्वपूर्ण होती ?

**Options :**

1. मासेमारी
2. धर्म व जादू
3. व्यसनाधिनता
4. बालविवाह

**Question Number : 73 Question Id : 750782601**

आदिवासी लोकांच्या जीवनातील खालीलपैकी कोणत्या बाबीचे जतन करावयास नको ?

**Options :**

1. आदिवासी नृत्यकला
2. सहचर्यावर आधारित जीवन
3. व्यसनाधिनता
4. विणकाम, चित्रकला

Question Number : 74 Question Id : 750782602

डॉ. मुजुमदार यांनी आदिवासींमध्ये नोंदविलेल्या समस्यांपैकी खालीलपैकी कोणती समस्या समाविष्ट होत नाही ?

Options :

1. न्यायालयीन व्यवस्था

2. स्थानांतरीत शेती

3. बालविवाह

4. अपहरण विवाह गुन्हा ठरविण्यात आला

Question Number : 75 Question Id : 750782603

सामिलीकरण सिद्धांतात आदिवासींसाठी कोणता उपाय करण्यात येतो ?

Options :

1. प्रगत समाजापासून वेगळे ठेवणे

2. प्रगत समाजाशी विलिनीकरण करणे

3. प्रगत समाजात संघर्ष करणे

4. प्रगत समाजाला डावलणे

Question Number : 76 Question Id : 750782604

'आदिवासींना सभ्य समाजापासून वेगळे ठेवले पाहिजे' हा विचार खालीलपैकी कोणत्या सिद्धांतातून प्रतित होतो ?

Options :

1. पृथकता

2. सात्मीकरण

3. एकात्मता

4. सांस्कृतिक समायोजन

**Question Number : 77 Question Id : 750782605**

अलिप्ततावाद सिद्धांताचे प्रणेते म्हणून कोणत्या मानवशास्त्रज्ञाचे नाव घेतले जाते ?

**Options :**

1. व्हेरिअर एल्विन

2. डॉ. जी. एस. घुर्ये

3. डॉ. डी. एन. मुजुमदार

4. डॉ. इरावती कर्वे

**Question Number : 78 Question Id : 750782606**

''आदिवासी भागात काम करू इच्छिणाऱ्या अधिकाऱ्याने आदिवासींच्या जीवनात संपूर्णपणे समरस होणे आवश्यक आहे. त्यांच्या सुख–दु:खात त्यांनी सहभागी झाले पाहिजे. त्यांच्या झोपड्यात जाऊन त्यांच्याशी बोलण्याची, त्यांच्या बरोबर कोरभर भाकर खाण्याची त्यांची तयारी असली पाहिजे. आपण कोणीतरी वेगळे अथवा मोठे आहोत असा अहंगड न बाळगता त्यांच्यात मिसळून त्यांचे प्रेम, विश्वास व आदर निर्माण केला पाहिजे.'' असे आदिवासींच्या एकीकरणाविषयी कोणी मत प्रगट केले ?

**Options :**

1. महात्मा गांधी

2. पंडित नेहरू

3. वीर सावरकर

4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Question Number : 79 Question Id : 750782607**

आदिवासींचे सामिलीकरण ही संकल्पना खालीलपैकी कोणी मांडली ?

**Options :**

1. डॉ. जी. एस. घुर्ये

2. डॉ. मुजुमदार

3. डॉ. श्रीनिवास

4. डॉ. एल्विन

**Question Number : 80 Question Id : 750782608**

अलिप्ततावाद हा आदिमांच्या समस्येवरील उपाय सर्वप्रथम कोणी मांडला ?

**Options :**

1. डॉ. हटन

2. ठक्कर बाप्पा

3. डॉ. मुजुमदार

4. डॉ. एल्विन

**Question Number : 81 Question Id : 750782609**

आदिवासी विकास विभागाची स्वतंत्रपणे स्थापना कधी करण्यात आली ?

**Options :**

1. 9 ऑगस्ट, 1972

2. 22 एप्रिल, 1976

3. 9 ऑगस्ट, 1980

4. 22 एप्रिल, 1983

**Question Number : 82 Question Id : 750782610**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम 2006 या कायद्या अंतर्गत "राज्यस्तरीय संनियंत्रण समिती" मध्ये अध्यक्ष म्हणून कोण कामकाज पाहतो ?

**Options :**

1. सचिव, वन विभाग

2. सचिव, आदिवासी विकास विभाग

3. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

4. सचिव, महसूल विभाग

**Question Number : 83 Question Id : 750782611**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम 2006 कोणत्या राज्याला लागू नाही ?

**Options :**

1. दिल्ली

2. अंदमान निकोबार

3. जम्मू व काश्मीर

4. पंजाब

**Question Number : 84 Question Id : 750782612**

केन्द्र सरकार मार्फत महाराष्ट्रात ट्रायफेड अंतर्गत प्रधानमंत्री वन धन योजना राबविण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून कोण काम पाहते ?

**Options :**

1. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

2. आदिवासी विकास महामंडळ

3. वन विकास महामंडळ

4. शबरी महामंडळ

**Question Number : 85 Question Id : 750782613**

मानव विकास निर्देशांक अहवाल कोण तयार करते ?

**Options :**

1. UNDP

2. UNO

3. WTO

4. UHDC

**Question Number : 86 Question Id : 750782614**

सन 2020 च्या यू.एन.डी.पी.च्या अहवालानुसार मानव विकास निर्देशांकात भारताचा कितवा क्रमांक आहे ?

**Options :**

1. 129 वा क्रमांक

2. 81 वा क्रमांक

3. 100 वा क्रमांक

4. 131 वा क्रमांक

**Question Number : 87 Question Id : 750782615**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे अधिनस्त पुणे येथे आदिवासी सांस्कृतिक संग्रहालयाची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

**Options :**

1. 1965

2. 1972

3. 1982

4. 1991

**Question Number : 88 Question Id : 750782616**

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीसंदर्भात पुढीलपैकी हे/ही विधान/विधाने सत्य आहे/आहेत.

अ. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र 3,07,713 चौ. किमी. एवढे असून त्यापैकी 50,757 चौ. किमी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते.

ब. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी 8.35% आदिवासी लोकसंख्या आहे.

**Options :**

1. फक्त 'अ'

2. फक्त 'ब'

3. दोन्हीही विधाने सत्य

4. दोन्हीही विधाने असत्य

**Question Number : 89 Question Id : 750782617**

आदिवासीच्या सामूहिक विकासासाठी इ. स. 1954 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका विभागीय परिषदेमध्ये खालील उद्दिष्टे स्वीकारण्यात आली.

अ. सामूहिक विकासामुळे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी आवश्यक मित्रत्वाचे वातावरण तयार करणे.

ब. उपलब्ध सामग्रीच्या आधारावर विकास घडवून आणणे आणि सुयोग्य नागरिक घडविणे.

क. पारंपारिक तंत्रज्ञान आणि विकास यातून उपलब्ध ज्ञानाचा उपयोग करून समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने सत्य आहे/आहेत ?

**Options :**

1. फक्त 'क'

2. फक्त 'अ'

3. फक्त ‘ब’

4. ‘ब’ आणि ‘क’

**Question Number : 90 Question Id : 750782618**

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेत नाविन्यपूर्ण योजनेचा समावेश कोणत्या वर्षापासून करण्यात आला ?

**Options :**

1. सन 2014-15

2. सन 2013-14

3. सन 2015-16

4. सन 2016-17

**Question Number : 91 Question Id : 750782619**

महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठीचा अधिनियम

**Options :**

1. 1976

2. 1974

3. 1975

4. 1973

**Question Number : 92 Question Id : 750782620**

प्रामुख्याने कोलाम या आदिम जमातीचे वास्तव्य महाराष्ट्रात कोणत्या जिल्ह्यात आहे ?

**Options :**

1. गडचिरोली

2. यवतमाळ

3. नंदूरबार

4. पालघर

**Question Number : 93 Question Id : 750782621**

बर्जेस यांनी कोणत्या संशोधन पद्धतीला ‘सामाजिक सूक्ष्मदर्शक यंत्र’ म्हटले आहे ?

**Options :**

1. लोकालेख पद्धती

2. व्यष्टी अध्ययन पद्धती

3. सहभागी निरीक्षण पद्धती

4. उपयोजित संशोधन पद्धती

**Question Number : 94 Question Id : 750782622**

आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेमार्फत कोणते कार्य केले जात नाही ?

**Options :**

1. आदिवासी जीवनावर लघूपटाची निर्मिती करणे.

2. आदिवासी लोकांकरिता प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे.

3. आदिवासी विद्यार्थ्यांकरिता अभ्यासक्रम तयार करणे.

4. आदिवासींकरिता राबवलेल्या योजनांच्या परिणामाचे मूल्यमापन करणे.

**Question Number : 95 Question Id : 750782623**

‘सहभागी निरीक्षण’ या संशोधन पद्धतीतील संशोधकाविषयी कोणते विधान सत्य आहे ?

**Options :**

1. संशोधक समूहात सहभागी न होता बाह्य निरीक्षक म्हणून काम करतो.

2. संशोधक समूहात सहभागी होऊन समूहाचे नेतृत्व करतो.

3. संशोधक समूहात सहभागी होऊन समूहाचा आंतरिक सदस्य होऊन जातो.

4. संशोधक समूहात सहभागी न होता केवळ बघ्याची भूमिका घेतो.

**Question Number : 96 Question Id : 750782624**

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र कोणत्या नमुन्यात मिळतो ?

**Options :**

1. नमुना ‘‘ग’’

2. नमुना ‘‘क’’

3. नमुना ‘‘फ’’

4. नमुना ‘‘इ’’

**Question Number : 97 Question Id : 750782625**

‘सहभागी निरीक्षण’ हे कोणत्या संशोधन पद्धतीचे तंत्र आहे ?

**Options :**

1. मूलभूत संशोधन पद्धती

2. उपयोजित संशोधन पद्धती

3. संख्यात्मक संशोधन पद्धती

4. गुणात्मक संशोधन पद्धती

**Question Number : 98 Question Id : 750782626**

‘सहभागी निरीक्षण’ या संज्ञेचा वापर सर्वप्रथम कोणी केला ?

**Options :**

1. लिंडमन

2. पिटर एच.

3. एम. एच. गोपाल

4. पाऊलिन यंग

**Question Number : 99 Question Id : 750782627**

आदिवासी विकास विभागाच्या 13/9/2019 च्या शासन निर्णया अन्वये नवीन किती समिती ची स्थापना करण्यात आली ?

**Options :**

1. ५

2. ६

3. ७

4. ८

**Question Number : 100 Question Id : 750782628**

अपील प्राधिकारणास व पडताळणी समितीस दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 अन्वये खालील कोणते अधिकार आहे ?

**Options :**

1. कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे शपथपत्रावर पुरावा स्विकारणे

2. कोणताही दस्तावेज शोधून काढण्यास व दाखल करण्यास भाग पाडणे

3. कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून सरकारी अभिलेख किंवा प्रत मागविणे

4. वरील सर्व अधिकार